ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक २६ • शनिवार दि.१७ ऑक्टोबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## किनवटमध्ये रेल्वे रुळांवर वाघीण मृतावस्थेत;अपघात की घातपात?



### अन्य कारणांचा संशय,वन विभागाच्या तपासावर प्रश्नचिन्ह

किनवट/प्रतिनिधी-बोधडी बु. वनपरिक्षेत्रातील वन परिमंडळाच्या दरसांगवी बिटात, आदिलाबाद ते नांदेड रेल्वे धावपट्टीवर रेल्वे विद्यूत पोल क्र.१०९००५ जवळ पैनगंगा अभयारण्यातील वाघीणीचा मृत्यू झाला. शनिवार दि.१७ ऑक्टोबर रोजीच्या पहाटे किनवटहून नांदेडकडे जाणाऱ्या रेल्वेच्या धडकेत मृत्यू झाल्याचा प्राथमिक अनुमान लावला जातोय.

खरबी आणि बोधडी वनविभागाने स्थळ पंचनामा करुन वाघीणीचे प्रेत शवविच्छेदन आणि अंत्यसंस्कारासाठी सावरी येथील वन आगारात नेण्यात आले. भरधाव रेल्वेच्या धडकेतच मृत्यू झाला की, अन्य कारणांनी?, हा तपास तरी वन्यजीव सुरक्षेच्या दृष्टीने निष्पक्ष होईल का?, असा सवाल व्यक्तविला जात आहे. १ ऑक्टोबर २०२६ रोजी याच दरसांगवी बिटातील शनिवारपेठ येथील संजय स्वामी या शेतकऱ्यांच्या कार्ला शिवारातील शेतात बांधुन असलेल्या बैलावर याच वाघीणीने हल्ला करून ठार मारले होते. तेव्हापासून त्याच शनिवारपेठ, कार्ला, भूलजा परिसरात ही वाघीण फिरत असल्याची चर्चा ऐकायला मिळत होती. विदर्भाच्या यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड तालुक्यातील पैनगंगा अभयारण्यात ही वाघीण नवीनच असल्याचे सूत्रांनी सांगितले. पैनगंगेचे पात्र कोरडे असल्यामुळे दरसांगवी बिटातील शनिवारपेठ-कार्ला शिवारात मार्ग चुकलेल्या वाघीणीने आश्रय घेतला होता अशी चर्चा होती, ती अखेर मृतावस्थेत सापडलेल्या वाघीणीमुळे खरी ठरली. मिळालेल्या खबरीवरुन बोधडी बु.चे वनपरिक्षेत्राधिकारी चंद्रकांत पोतुलवार आणि त्यांचे पथक आणि खरबीचे वन परिक्षेत्राधिकारी तुळशीराम साळुंके आणि त्यांची टीम. किनवटचे वनपरिक्षेत्राधिकारी धिरज मदने आणि त्यांच्या पथकाने विनाविलंब घटनास्थळी जाऊन संयुक्त कारवाई केली. तदोपरांत सावरी येथील वन आगाराकडे मृत वाघीणीचे प्रेत हलवले. दरम्यान किनवट पंचायत समितीच्या पशुसंवर्धन विभागाचे पान ४ वर

## मराठवाड्यात काही ठिकाणी पावसाचा इशारा

मुंबई/प्रतिनिधी-राज्यात हवामानातील चढ-उतार सुरूच असून, काही भागांत उन्हाचा कडाका वाढला आहे, तर काही जिल्ह्यांत वादळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मुंबई, ठाणे आणि रायगडमध्ये उष्ण व दमट हवामानाचा अंदाज असून, पश्चिम महाराष्ट्रासह कोकणातील काही भागांना पावसाचा इशारा देण्यात आला आहे. बदलत्या हवामानामुळे नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे. मराठवाड्यात देखील काही ठिकाणी २२ ते २९ ऑक्टोबर पर्यंत पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, तापमानातील चढ-उतार आणि वातावरणातील बदलांमुळे पावसासाठी पोषक परिस्थिती निर्माण झाली आहे. तामिळनाडू आणि आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीजवळ चक्राकार वाऱ्यांची स्थिती निर्माण झाल्याने राज्यातील काही भागांत मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्ह्यांत उष्णतेसोबत दमट हवामानाचा त्रास जाणवण्याची शक्यता आहे. दुसरीकडे सिंधुदुर्ग, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यांत वादळी वाऱ्यांसह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला असून, संबंधित भागांसाठी यलो अलर्ट देण्यात आल्याचे वृत्त आहे.

## सणासुदीत साखरेचे दर नियंत्रणात राहणार

### केंद्र सरकारकडून दर नियंत्रणासाठी हालचाली

नवी दिल्ली:सणासुदीच्या काळात बाजारात साखरेचा पुरवठा वाढवण्यासाठी साखर कारखान्यांना ऑक्टोबरमध्ये उत्पादित झालेली साखर ऑक्टोबर किंवा नोव्हेंबरमध्ये विकण्याची परवानगी देण्यात आली आहे. ही विक्री नियमित मासिक कोट्याव्यतिरिक्त असल्याने बाजारातील साखरेची उपलब्धता वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे संभाव्य दरवाढीला आळा बसून ग्राहकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

महागाईमुळे सर्वसामान्यांचे घरगुती बजेट कोलमडले असताना साखरेच्या दरांबाबत केंद्र सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय अन्न मंत्रालयाकडून देशांतर्गत बाजारात साखर विक्रीसाठी दर पंधरवड्याला कोटा निश्चित केला जातो. ऑक्टोबरच्या पहिल्या पंधरवड्यासाठी १३ लाख टन, तर दुसऱ्या पंधरवड्यासाठी १४ लाख टन साखर विक्रीचा कोटा मंजूर करण्यात आला होता. आता याव्यतिरिक्त अतिरिक्त साखर विक्रीची परवानगी दिल्याने बाजारातील पुरवठा वाढण्यास मदत होणार आहे. ऑल इंडिया शुगर ट्रेड असोसिएशनचे अध्यक्ष प्रफुल्ल विठ्ठलानी यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. अनेक साखर कारखान्यांमध्ये नियोजित वेळेच्या जवळपास एक महिना आधीच ऊस गाळप सुरू झाल्याने नव्या हंगामातील साखर बाजारात उपलब्ध होण्याची शक्यता आहे. यामुळे घाऊक आणि किरकोळ बाजारातील दर स्थिर ठेवण्यास मदत होऊ शकते.दरम्यान, साखरेचे किरकोळ दर यापूर्वी किलोमागे ७० रुपयांपर्यंत पोहोचल्याचे वृत्त होते. वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर सणासुदीत साखरेची मागणी पान ४ वर

## पालाईगुडा फाट्याजवळ भीषण अपघात;एक ठार,चार जण गंभीर जखमी

माहूर/प्रतिनिधी-माहूर-सारखनी मार्गावरील राष्ट्रीय महामार्ग १६१-ए वर पालाईगुडा फाट्याजवळ दोन मोटरसायकलींच्या अपघातात गोंडवडसा येथील एका तरुणाचा मृत्यू झाला, तर चार जण गंभीर जखमी झाले. शनिवार, दि.१७ ऑक्टोबर रोजी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास घडलेल्या या भीषण घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.



गोंडवडसा येथील गजानन शंकर आशेवाड (वय ३५), कुंदन किशोर बावणे (वय ३०) आणि अतुल रमेश बावणे (वय २०) हे तिघे स्प्लेंडर मोटरसायकल क्रमांक एमएच २६ बी.आर. ९१५४ वरून सारखनी येथून पालाईगुडा फाटामार्गे गोंडवडसा येथे जात होते. त्याचवेळी दराटी, ता. किनवट येथील दोघे जण स्प्लेंडर प्रो मोटरसायकल क्रमांक एमएच २९ एएक्यू ९१४० वरून पुढे जात होते. पालाईगुडा फाट्याजवळ गोंडवडसा येथील मोटरसायकलला मागून अज्ञात वाहनाने धडक दिल्याने ती पुढे जात असलेल्या दुसऱ्या मोटरसायकलवर आदळली. या धडकेमुळे दोन्ही मोटरसायकलींवरील पाचही जण रस्त्यावर कोसळले. या अपघातात सर्वांना गंभीर दुखापती झाल्या. अपघात घडल्यानंतर अज्ञात वाहनचालक घटना-स्थळावरून पसार झाला. रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. माहिती मिळताच सिंदखेड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जोंधळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक नागरिकांच्या मदतीने पाचही जखमींना दहेली तांडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले. पान ४ वर

## मराठवाडा पदवीधर मतदारसंघात परिवर्तन अटळ-शशिकांत शिंदे

नांदेड/प्रतिनिधी-देशातील व राज्यातील परिस्थिती पाहता मराठवाडा पदवीधर विधान परिषदेच्या निवडणुकीत परिवर्तन होईल अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी आज पत्रकार परिषदेत बोलतांना दिली आहे.

मराठवाडा पदवीधर मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार), काँग्रेस व महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ.प्रतापसिंह पाटील यांच्या प्रचारार्थ बैठक घेण्यात आली. त्यानंतर पत्रकार परिषदेत बोलतांना शशिकांत शिंदे म्हणाले की, सर्वसामान्य जनतेला रस्त्यावर उतरुन लढाई लढावी लागत आहे. एसआयआर प्रकरणावरुन नवी दिल्ली व देशभरात आंदोलने केली जात आहेत. त्यामुळे केंद्रातील व राज्यातील भाजप सरकार विषयी सर्वसामान्य जनतेमध्ये किती संताप आहे हे दिसून येते. राज्यात दुष्काळाची भीषण परिस्थिती असतांना सरकारने शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांची मदत जाहीर करुन एकप्रकारे त्यांची थट्टाच केली आहे.



दुष्काळग्रस्त भागांसाठी सरकारने तातडीने पाऊले उचलणे आवश्यक आहे. महायुतीच्या उमेदवाराने गेल्या तीन टर्ममध्ये पदवीधरांचे प्रश्न सोडविण्यासाठी कोणत्याही प्रकारचे प्रयत्न केले नाहीत. त्यामुळे पदवीधरांमध्ये त्यांच्याविषयी तीव्र नाराजी पसरलेली असून परिवर्तनाचे वारे वाहू लागले आहेत. मराठवाडा पदवीधर मतदारसंघ हा जागा वाटपात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सुटला आहे. शिवसेना (उबाठा) पक्षानेही उमेदवार उभा केला आहे. जागा वाटपावरुन काही मार्ग निघाला नसला तरी अजुनही शिवसेनेसोबत चर्चा सुरु आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार डॉ. प्रतापसिंह पाटील हे पदवीधरांचे प्रश्न सोडविण्यासाठी नेहमीच सक्रीय असतात. शिक्षण क्षेत्रासह अन्य क्षेत्रातही त्यांचे मोठे कार्य आहे. डॉ.प्रतापसिंह पाटील यांना सर्वच स्थरातून चांगला पाठिंबा मिळत असल्याचे शशिकांत शिंदे यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला माजी मंत्री डॉ.माधवराव किन्हाळकर, खा.प्रा.रविंद्र चव्हाण, डॉ.प्रतापसिंह पाटील, विठ्ठल पावडे, अब्दुल गफार, महेश देशमुख, भगवानराव आलेगावकर व इतर मान्यंवर उपस्थित होते.

## ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी रुग्णालयात दाखल

नवी दिल्ली:भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणी (वय ९८) यांना छातीत संसर्ग झाल्याने दिल्लीतील अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. शुक्रवारी सायंकाळी साडेसातच्या सुमारास त्यांना रुग्णालयात आणण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून फुफ्फुस विभागात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

अडवाणी यांना छातीत संसर्गाची तक्रार जाणवल्यानंतर रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार सुरू असून त्यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवले जात आहे.दरम्यान, रुग्णालयात दाखल होण्याच्या सुमारे आठवडाभर आधी, ७ ऑक्टोबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीतील अडवाणी यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली होती. लालकृष्ण अडवाणी यांनी भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून तीन वेळा जबाबदारी सांभाळली. त्यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचा देशभरातील जनाधार वाढला. १९८४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला केवळ दोन जागा मिळाल्या होत्या; मात्र १९८९ मध्ये पक्षाने ८५ जागा जिंकल्या. पुढे १९९६ मध्ये भाजप लोकसभेतील सर्वांत मोठा पक्ष ठरला. सध्या अडवाणी यांची प्रकृती स्थिर आहे.



## व्हय रं भाऊ!पदवीधरांचे आमदार अन् सहा वर्षांची छत्री!






विधान परिषदेतील पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुका आल्या की, राजकीय नेत्यांच्या अंगात असा संचार होतो; जणू राज्यातील बेरोजगारी संपवण्याची किल्ली त्यांच्याच खिशात आहे! सहा वर्षे गायब असलेले चेहरे अचानक प्रकट होतात. पदवीधरांच्या अडचणींची जाणीव होते, बेरोजगारांच्या भविष्याची काळजी वाटू लागते आणि शिक्षण क्षेत्रातील प्रश्नांवर कँठ फुटतो. कालपर्यंत ज्यांना मतदारांचा फोन उचलायला वेळ नव्हता, त्यांना आता प्रत्येक पदवीधराचा नंबर पाठ होतो. निवडणूक म्हणजे नेत्यांसाठी मतदारांची आठवण करून देणारे रामबाण औषध!

मराठवाडा पदवीधर मतदारसंघात तर राजकीय गणितांची चांगलीच जत्रा भरली आहे. भाजपने ही जागा मित्रपक्षातील अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला सोडली आहे. प्रस्थापित उमेदवार पुन्हा मैदानात आहेत. काँग्रेस, शिवसेना आणि शिक्षक संघटनांचे उमेदवारही आपापली ताकद आजमावत आहेत. कुणाचा पक्ष मोठा, कुणाची संघटना मजबूत, कुणाचे संस्थांचे जाळे विस्तीर्ण, याची चर्चा सुरू आहे. मात्र या सगळ्या राजकीय बाजारात पदवीधरांच्या प्रश्नांचा भाव किती आहे, हे कुणी सांगायला तयार नाही. उमेदवारांची बेरीज-वजाबाकी जोरात सुरू आहे; फक्त बेरोजगारांच्या नोकरीच्या हिशेबात मात्र नेहमीप्रमाणे शून्यच!

पूर्वी पदवीधर मतदारसंघ हा अभ्यासू, विचारवंत आणि शिक्षण क्षेत्राशी निगडित लोकांना विधान परिषदेत पाठवण्याचा मार्ग मानला जायचा. शिक्षक संघटना आणि पदवीधरांच्या संघटना आपले प्रतिनिधी निवडून द्यायच्या. आता या मतदारसंघालाही राजकीय पक्षांनी आपापल्या प्रतिष्ठेचा आखाडा बनवला आहे. शिक्षण संस्थांचे पाठबळ, राजकीय संपर्क आणि संघटनात्मक ताकद यांच्या जोरावर निवडणुकीचे गणित जुळवले जाते. पण संस्थांचे जाळे कितीही मोठे असले तरी त्यातून बेरोजगार तरुणांसाठी नोकऱ्या पकडून बाहेर येणार आहेत का? की त्या जाळ्यात फक्त मतांचे मासे पकडले जाणार आहेत? हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे.

मराठवाड्यात हजारो तरुण पदव्या घेऊन रोजगाराच्या शोधात वणवण फिरत आहेत. सरकारी खात्यांत पदे रिक्त आहेत, अनेक पदे रद्द झाली आहेत, तर उरलेल्या संधींवर कंत्राटीकरण आणि एकत्रित वेतनाची टाच बसली आहे. तरुणाने वर्षानुवर्षे अभ्यास करायचा, परीक्षा द्यायची, अर्ज भरायचे, निकालाची वाट पाहायची आणि शेवटी हातात घ्यायचे ते असुरक्षित नोकरीचे पत्र! पदवीधरांच्या आयुष्यात सरकारी भरती म्हणजे मृगजळ आणि कंत्राटी नोकरी म्हणजे तहानलेल्या माणसाला दाखवलेले पाण्याचे चित्र! या परिस्थितीत पदवीधरांचे आमदार नेमके काय करतात? विधान परिषदेत किती प्रश्न मांडतात? सरकारला किती वेळा जाब विचारतात? भरतीसाठी किती दबाव निर्माण करतात? याचा हिशेब जनतेसमोर यायला हवा. निवडणुकीच्या काळात मात्र आश्वासनांचा पाऊस इतका पडतो की बेरोजगारीचे सारे डबके भरून वाहतील असे वाटते. प्रत्येक तरुणाला रोजगार, प्रत्येक शिक्षकाला न्याय आणि प्रत्येक पदवीधराला सन्मान देण्याची भाषा केली जाते. पण निकाल लागताच आश्वासनांच्या ढगांना अचानक दुष्काळ पडतो! मतदारांचा फोन बंद, भेटीगाठी बंद आणि प्रश्न विचारले तर उत्तरांची बॅटरी संपलेली! म्हणूनच मराठवाड्यातील पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांचे काही आमदार पावसाळ्यात उगवणाऱ्या छत्रीसारखे वाटतात. पाऊस सुरू झाला की छत्री उघडायची, पाऊस थांबला की कोपऱ्यात ठेवायची! फरक एवढाच की छत्री निदान पावसापासून बचाव करते; आमदारांनी बेरोजगारीच्या पावसात किती जणांना आधार दिला, याचा हिशेब मात्र मतदारांना स्वतःच शोधावा लागतो.

यंदा पदवीधरांनी मतदान करताना उमेदवाराच्या पक्षाचा झेंडा नव्हे, तर त्याच्या कामाचा झेंडा पाहावा. मागील काळात सभागृहात काय केले, बेरोजगारीवर किती आवाज उठवला आणि प्रश्न सोडवण्यासाठी किती पाठपुरावा केला, याची विचारपूस करावी. कारण पदवीधर मतदारसंघ म्हणजे राजकीय नेत्यांना सहा वर्षांची विश्रांती देणारे निवासस्थान नाही! व्हय रं भाऊ, पदवीधरांच्या हातात पदवी, खिशात बेरोजगारी आणि आमदारांच्या हातात सहा वर्षांची छत्री, हे चित्र आता बदलायलाच पाहिजे! नाहीतर निवडणूक आली की आश्वासनांचा पाऊस, निकाल लागला की, कामाचा दुष्काळ आणि सहा वर्षांनी पुन्हा त्याच छत्रीचे दर्शन!

# ‘सर्वोच्च’खडे बोल नेमके कोणाला?

**न्यायालयीन टिप्पणीचा राजकीय अर्थ लावण्याची घाई कशासाठी? एसआयआर विरोधातील आंदोलनाला बदनाम करण्याऐवजी मतदारांच्या मनातील प्रश्नांची उत्तरे द्या! लोकशाहीत सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारणे हा विरोधकांचा अधिकार असतो आणि त्या प्रश्नांची उत्तरे देणे ही सत्ताधाऱ्यांची जबाबदारी असते. मात्र, प्रश्न विचारणाऱ्यांनाच देशविरोधी ठरवायचे, आंदोलन करणाऱ्यांना अर्बन नक्षलवादी संबोधायचे आणि न्यायालयीन टिप्पणीचाही राजकीय सोयीने अर्थ लावायचा, अशी प्रवृत्ती वाढत असेल तर लोकशाहीच्या आरोग्याची चिंता करावी लागते. मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणावरून (एसआयआर) देशभरात सुरू असलेला वाद आणि त्यावर सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीच्या निमित्ताने हाच प्रश्न ऐरणीवर आला आहे. सर्वोच्च न्यायालयाचे खडे बोल नेमके कोणाला होते, यापेक्षा ते कोणत्या संदर्भात होते आणि त्याचा राजकीय अर्थ कसा लावला जात आहे, हे महत्त्वाचे आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने सुरू केलेल्या एसआयआर मोहिमेवरून अनेक राज्यांत राजकीय संघर्ष तीव्र झाला आहे. मतदार याद्यांचे शुद्धीकरण ही निवडणूक प्रक्रियेतील आवश्यक बाब असली, तरी त्याच्या नावाखाली पात्र मतदारांची नावे वगळली जात असतील, तर त्यावर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. मतदार यादीतील बोगस नोंदींबाबत विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पुराव्यांसह आरोप केले. मात्र, या आरोपांची गांभीर्याने दखल घेण्याऐवजी त्यांची खिल्ली उडविण्यावर सत्ताधारी पक्षातील काही नेत्यांनी भर दिला. लोकसभा निवडणुकीतील अपेक्षित यश न मिळाल्यानंतर महाराष्ट्रात महायुती सरकारने सुरू केलेली लाडकी बहीण योजना आणि निवडणूक प्रक्रियेतील कथित अनियमितता यांचाही राजकीय चर्चेत वारंवार उल्लेख झाला. या आरोपांची सत्यता तपासणे आवश्यक असले, तरी प्रश्न विचारणाऱ्यांना हिणवून त्यांची उत्तरे मिळत नाहीत.पश्चिम बंगालमध्ये एसआयआरच्या मुद्द्यावर तत्कालीन मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयीन हस्तक्षेपानंतरही मतदार याद्यांच्या शुद्धतेबाबत आक्षेप कायम असल्याचे आरोप होत आहेत. त्यातच केंद्रीय निवडणूक आयोगातील दोन निवडणूक आयुक्तांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीबाबत नोंदविलेल्या कथित आक्षेपांची माहिती प्रसार माध्यमांत आली. या घडामोडींमुळे निवडणूक आयोगाच्या कामकाजातील पारदर्शकता, निर्णयप्रक्रिया आणि संस्थात्मक स्वायत्तता याबाबतच्या चर्चेला अधिक धार मिळाली. निवडणूक आयोग ही लोकशाहीतील अत्यंत महत्त्वाची घटनात्मक संस्था आहे. त्यामुळे तिच्या कामकाजाबाबत उपस्थित होणाऱ्या प्रश्नांना राजकीय आरोप म्हणून झटकून टाकता येणार नाही. दरम्यान, राहुल गांधी यांनी विविध ठिकाणी सभा घेऊन निवडणूक प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित केले. त्याच पार्श्वभूमीवर कॉकरोच जनता पार्टीचे अभिजीत दीपके आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आंदोलनाची घोषणा केली. या आंदोलनाला सामान्य जनतेचा पाठिंबा नाही, विरोधकांच्या पाठीशी लोक उभे नाहीत, असा दावा सत्ताधारी भाजपकडून केला जात असताना आंदोलन दडपण्याचे प्रयत्न झाल्याचे आरोप पुढे आले. मग प्रश्न असा पडतो की, आंदोलनाला जनतेचा पाठिंबा नसेल तर त्याकडे एवढ्या गांभीर्याने पाहण्याची आणि ते मोडून काढण्याची गरज का भासावी? लोकशाहीत जनतेचा पाठिंबा कोणाला आहे, हे सत्ताधाऱ्यांच्या घोषणांनी नव्हे, तर जनतेच्या प्रत्यक्ष सहभागातून आणि निवडणुकीतील कौलातून स्पष्ट होते. याच वातावरणात सर्वोच्च न्यायालयासमोरील मोर्चानंतर दाखल झालेल्या याचिकांच्या सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी केलेल्या टिप्पणीची चर्चा सुरू झाली. न्यायालयाने सरकारला नोटीस बजावली आणि याचिकाकर्त्यांबाबतही निरीक्षण नोंदवले. या टिप्पणीचा संबंध राहुल गांधी यांच्याशी असल्याचा दावा भाजपच्या काही नेत्यांनी केला. मात्र, त्यासंदर्भातील लेखी माहिती समोर आल्यानंतर ही टिप्पणी शिवसेना नेते खा.संजय राऊत यांच्याशी संबंधित असल्याचे स्पष्ट झाले. न्यायालयीन निरीक्षणांचा संपूर्ण संदर्भ समजून न घेता त्यांचा राजकीय लाभासाठी वापर करण्याची घाई किती अयोग्य आहे, हे या घटनेतून अधोरेखित होते. न्यायालयाने केलेली टिप्पणी ही अंतिम निकाल नसते. तिचा अर्थ ठरवताना सुनावणीचा संदर्भ, याचिकेतील मुद्दे आणि न्यायालयाचे प्रत्यक्ष लेखी निरीक्षण यांचा विचार करावा लागतो. त्यामुळे एखाद्या टिप्पणीचा संबंध आपल्या राजकीय विरोधकाशी जोडून त्याला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्यापेक्षा वस्तुस्थिती समजून घेणे अधिक महत्त्वाचे आहे. न्यायालयाचा सन्मान राखायचा असेल, तर त्याच्या निरीक्षणांचा सोयीस्कर अर्थ लावण्याची राजकीय घाईही टाळली पाहिजे. एसआयआर विरोधातील आंदोलनाला अर्बन नक्षलवाद्यांचे आंदोलन ठरविणे किंवा त्याला जनतेचा पाठिंबा नसल्याचे सांगणे हा मूळ प्रश्नाला बगल देण्याचा प्रकार ठरू शकतो. तरुणाई रस्त्यावर का उतरते आहे, मतदार याद्यांबाबत तिच्या मनात कोणत्या शंका आहेत आणि निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर अविश्वास का व्यक्त केला जात आहे, याचा विचार सत्ताधाऱ्यांनी केला पाहिजे. आंदोलनातील प्रत्येक मागणी योग्यच असेल असे नाही; आंदोलनातील प्रत्येक आरोप सत्यही असेल असे नाही. पण त्यामुळे सर्व प्रश्नच निराधार ठरत नाहीत. लोकशाही केवळ मतदानाच्या दिवशी जिवंत असते असे नाही. मतदाराला आपले नाव यादीत असल्याची खात्री, निवडणूक प्रक्रियेवर विश्वास आणि घटनात्मक संस्थांच्या निष्पक्षतेबद्दल आश्वस्तता असणेही तितकेच आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाचे खडे बोल कोणाला उद्देशून होते, यावरून राजकीय श्रेयवाद करण्यापेक्षा न्यायालयीन प्रक्रियेचा आदर आणि जनतेच्या प्रश्नांची उत्तरे देण्याची तयारी दाखविणे अधिक गरजेचे आहे. आंदोलनकर्त्यांना बदनाम करून लोकशाहीतील अस्वस्थता संपणार नाही. उलट, प्रश्न विचारणाऱ्यांना शत्रू मानण्याची वृत्ती लोकशाहीला अधिक कमकुवत करेल. सत्ताधाऱ्यांनी हे लक्षात घ्यावे की, जनतेचा आवाज दडपण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा तो ऐकून घेणे अधिक शहाणपणाचे असते. कारण लोकशाहीत अखेरचा निर्णय सत्ताधाऱ्यांच्या घोषणांचा नसतो, तर जागरूक मतदारांचा असतो.**

# सेवा,साधेपणा आणि सदाचाराचा मंत्र देणारे स्व.बंसीलालजी काबरा

नांदेडचे एक सुप्रसिद्ध व्यक्तिमत्व दिवंगत ॲड. बंसीलालजी काबरा यांच्या स्मृतित मागील २९ वर्षांपासून नांदेडमध्ये आगळ्या-वेगळ्या स्वरूपाची पण लाभदायक अशी आयकर-विक्रीकर व्याख्यानमाला सुरु आहे. काही चार्टर्ड अकाउंटंट आणि टॅक्स कंसलटंट तसेच सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींनी एकत्रितपणे सन १९९६ मध्ये व्याख्यानमाला सुरु केली. ॲड.बंसीलालजी काबरा यांचे योगदान कायम लक्षात राहावे आणि त्यांची स्मृती जपली गेली पाहिजे असा मानस व्याख्यानमाला आयोजनामागे असला तरी मुख्य उद्देश्य नवीन पिढीला त्यांच्या कार्यांची माहिती व्हावी सोबतच ‘आयकर व विक्रीकर कायदे तसेच शासनातर्फे वेळोवेळी प्रस्तावित नवीन नियमाविषयी सत्य माहिती प्रसारित व्हावी हा मुख्य हेतु आहे. या क्षेत्रात कार्यरत सर्वांना व्याख्यानमालेमुळे शिकायला मिळतं ही वास्तविकता आहे.

पाहता-पाहता २८ वर्षे सतत व्याख्याने (सत्र) पूर्ण पार पडली आहेत. उद्या दि. १८ ऑक्टोबर रोजी व्याख्यानमालेचे २९ वें पुष्प गुंफले जाणार आहे. यावर्षी व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध चिकित्सक डॉ.पुरुषोत्तम दाड राहणार आहेत तर उद्घाटक म्हणून मेडिकल असोसिएशन महाराष्ट्राचे अध्यक्ष डॉ.संजय कदम यांची उपस्थिती लाभणार आहे. तसेच नागपूर येथील जीएसटी तज्ञ सीए प्रीतम बत्रा आणि नांदेड येथील सीए ॲड.बालाजी राजे यांचे क्रमशः जीएसटी आणी आयकर विषयावर मुख्य व्याख्यान होईल. व्याख्यानमाला समितितर्फे यावर्षी सीए किशन माठोरे (नांदेड) आणि ॲड.शंकर गुंडलवार यांचा त्यांच्या कार्य योगदानामुळे विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

ज्यांच्या नावाने ही व्याख्यानमाला सतत २९ वर्षे सुरु आहे ते ॲड.स्व.बंसीलालजी काबरा यांच्या व्यावसायिक आणि सामाजिक जीवनाचे तीन महत्वपूर्ण असे सूत्र होते. सेवा, साधेपणा व सदाचार! त्यांनी अविरत ते सूत्र जीवनात पाळले आणी ‘साधी राहणी, उच्च विचार सरणी’ हे उदाहरण सर्वांपुढे प्रस्तुत केले. त्यात प्रामाणिकपणा त्यांचा उत्तम असा गुण होता. बंसीलालजी काबरा यांचा जन्म दि. १ मे,१९२५ रोजी हिंगोली येथे झाला होता. सुमारे पन्नास वर्षें त्यांनी आयकर-विक्रीकर सल्लागार म्हणून सेवा पार पाडली. त्यांचा व्यवसाय एका प्रकारे जनसेवाच होता म्हंटलं तर वावगं ठरणार नाही. त्यांच्या आईंचे नाव स्व. जमनाबाई व वडिलांचे नाव स्व. मोहनलाल काबरा होते. बंसीलालजी काबरा यांचे शालेय शिक्षण हिंगोली व परभणी येथे झाले. नंतर त्यांनी हैदराबाद येथे हॉस्टेलमध्ये राहून बीएससी, एलएलबीची पदवी मिळवली. हॉस्टेलमध्ये विजेचा मोठा प्रश्न होता. रात्रीच्या वेळी ते पथदिव्याखाली बसून अभ्यास पूर्ण करायचे. मोठ्या संघर्षाशी सामना करीत त्यांनी एलएलबी पदवी मिळवली आणि घरी परतले. लगेच त्यांनी आयकर आणि विक्रीकर क्षेत्रातील कामास सुरुवात केली.



स्व. बंसीलालजी काबरा यांनी आयकर विक्रीकर क्षेत्रात कार्य सुरुच केले होते की केंद्र शासनाने सन १९६१ साली आयकर विषयीचा नवीन कायदा प्रस्तावित केला होता. उद्योजक, व्यापारी आणि सामान्य करदात्यांना नवीन कायद्याविषयी फारसे ज्ञान नव्हते. त्यावेळी बंसीलालजी काबरा यांनी त्या नवीन कायद्याचा सूक्ष्मपणे अभ्यास केला. त्याविषयी करदात्यांना व आयकर-विक्रीकर क्षेत्रातील लोकांना मार्गदर्शन केले. म्हणून त्यावेळी त्यांना आयकर आयुक्तालय नाशिकच्यावतीने सल्लागार मंडळात सदस्य म्हणून नियुक्ती देण्यात आली होती. दरवर्षी मांडण्यात येणाऱ्या राष्ट्रीय अर्थसंकल्पाचेही त्यांना ज्ञान असायचे. प्रत्येक अर्थसंकल्प सादर होताच आयकर-वक्रीकर प्रैक्टिसनर, विद्यार्थी, व्यापारी त्यांच्याशी संपर्क करुन प्रत्यक्ष मार्गदर्शन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात गर्दी करायचे. आपल्या प्रत्येक अशिलाशी ते व्यक्तिशः संपर्क ठेवायचे आणि प्रत्येक करदात्याला व्यक्तिशः बोलावून मार्गदर्शन करायचे. त्या काळात त्यांचे समकालीन आयकर विक्रीकर सल्लागार म्हणून बिहारीलाल काबरा, बाबूराव फलक, आर.आर. मालपानी, एस.के. निंबाळकर, डाह्याभाई पटेल, रामकृष्ण अवधानी, सदाशिवराव पाटील कार्यरत होते. वरील सर्व मंडळीशी त्यांचे आदराचे व जिव्हाळ्याचे संबंध होते. स्व. बंसीलालजी काबरा यांची कार्य करण्याची एक विशिष्ट अशी शैली होती. त्यांच्याकडे एक कार्यनिती होती आणि नित्तिमत्ता सुद्धा होती. प्रमाणिकपणा, सोबत नित्तिमत्तेची सांगड घालून त्यांनी सर्वांना जवळ केले.

स्व. बंसीलालजी काबरा यांच्या आदर्शावर चालून त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांचा वारसा कायम ठेवला. ॲड. जयप्रकाश काबरा आणि इतर सदस्य त्याच प्रामाणिकतेने सेवेत समर्पित आहेत. त्यांचे एक शिष्य व नांदेड येथील सामाजिक कार्यकर्ते ॲड. चिरंजीलाल दागडिया यांनी पुढाकार घेऊन स्व. बंसीलाल काबरा आयकर विक्रीकर व्याख्यानमाला सुरु केली. त्यासाठी एका संयोजन समितीची स्थापना करण्यात आली. संयोजन समितीमध्ये ॲड. जयप्रकाश काबरा, सीए प्रवीण पाटील, माजी आ.ओमप्रकाश पोकर्णा, सीए विजय मालपानी, सीए जयप्रकाश फलोर, वसंत मैय्या, गंगाबिशन कांकर, अलीभाई पंजवानी, संपादक कृष्णा शेवडीकर, शंभुभाई भानु, सीए पी. एच. गट्टानी, सीए गोविंद मुंदडा, सीए हर्षद शहा, रामचंद्र रंगनानी, कमल कोठारी, सीए मनोहर आयलाने, ॲड.अनिल जोशी, पत्रकार स. रविंद्रसिंघ मोदी, सीए प्रशांत काबरा आणि सीए प्रतीक काबरा यांचा समावेश आहे. वरील व्याख्यानमाला आता उद्योग जगतात कार्यरत प्रत्येकासाठी संदेश व नवीन माहिती देऊन जाणारी होईल यात शंका नाही.

**स.रविंद्रसिंघ मोदी**
(सदस्य व्याख्यानमाला समिती)

---

मा.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,कंधार यांच्या न्यायालयात

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४०५/२०२६
(CNR No.MHND10-001355-2026)

अर्जदार -

| | | | |
|---|---|---|---|
| १ | विठाबाई भ्र.किशन दैठणेकर | वय-६० वर्षे | धंदा-घरकाम |
| २ | आनंद पि.किशनराव दैठणेकर | वय-३३ वर्षे | धंदा-मजुरी |
| ३ | ज्ञानोबा पि.किशन दैठणेकर<br>तिघे रा.दैठणा ता.कंधार जि.नांदेड | वय-३० वर्षे | धंदा-मजुरी |
| ४ | सुनिता भ्र.नागोराव कल्हाळे<br>रा.मु.उमरज पो.दगडसांगवी ता.लोहा<br>जि.नांदेड | वय-३५ वर्षे | धंदा-घरकाम |

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारचे अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ ते ४ चे वडिल नामे किशन होनाजी दैठणेकर हे होते ते दिनांक १६/०२/२०२६ रोजी मयत झाले आहेत. अर्जदारांचे म्हणणे आहे की, किशन होनाजी दैठणेकर यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत किशन होनाजी दैठणेकर यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी मयताचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत किशन होनाजी दैठणेकर यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-२३/११/२०२६

आज रोजी दि.१६/१०/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| **कनिष्ठ लिपीक** | **सहायक अधिक्षक** |
| दिवाणी न्यायालय | सह दिवाणी न्यायालय |
| क.स्तर,कंधार | क.स्तर,कंधार |

---

## जाहीर प्रगटन

मा.श्री.ए.जी.चव्हाण,६ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नांदेड
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४५७/२०२६
गणपती व इतर विरुध्द निरंक

अर्जदार:- १. गणपती पि.दत्ता घोरपडे वय : ५२ वर्षे, धंदा : शेती, २. अक्षय पि.गणपतराव घोरपडे वय : ३२ वर्षे, धंदा : व्यापार, दोघे रा.मु.वाहेगाव, पो.बेटसांगवी, ता.जि.नांदेड, ३. वैशाली भ्र.नरेंद्र नळेगावकर वय : ३१ वर्षे, धंदा : घरकाम, रा.सारंग सोसायटी, नांदेड सिटी पुणे ता.जि.पुणे, ४. वैष्णवी पि.गणपती घोरपडे वय : २५ वर्षे, धंदा : शिक्षण, रा.मु.वाहेगाव, पो.बेटसांगवी, ता.जि.नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

दावा: बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ ते ४ यांनी कायदेशीर वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जदार हे मयत यमुना भ्र.गणपती घोरपडे यांचे कायदेशीर वारसदार असून अर्जदार क्र.१ हा त्यांचे पती, अर्जदार क्र.२ हा त्यांचा मुलगा व अर्जदार क्र.३ व ४ ही त्यांची मुले आहे. त्यांचा मृत्यू दिनांक १३/०५/२०२६ रोजी नांदेड येथे झाला, त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र नांदेड महानगरपालिकेने निर्गमित केले असून त्यांच्या मृत्यू प्रमाणपत्राच्या प्रती प्रस्तुत संचिकेत दाखल करण्यात आलेल्या आहेत. अर्जदाराच्या अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारस नाही, असे अर्जदारांनी अर्जात नमुद केले आहे. अर्जदारास शासकीय तसेच निमशासकीय कार्यालयीन कामासाठी वारसाहक्क प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, अर्जदार यांना मयत यमुना भ्र.गणपती घोरपडे यांचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकीलामार्फत या न्यायालयात दिनांक १६/११/२०२६ पर्यंत किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत हजर राहून आक्षेप नोंदवावा/सादर करावा. या तारखेनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. तसेच अर्ज एकतर्फी निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

करिता हे जाहीर प्रगटन आज दिनांक २८/०९/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | आदेशावरुन |
| कनिष्ठ लिपीक | स्वाक्षरित/- |
| ६ वे सह दिवाणी न्यायालय | सहायक अधिक्षक |
| क.स्तर,नांदेड | दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड |

---

हमदस्त-ॲड.के.एस.बेग
जा.क्र.१८३५/२०२६
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग न्यायालय कंधार
दि.१६/१०/२०२६

## जाहीर प्रगटन

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग कंधार जि.नांदेड यांचे न्यायालयात
इतर फौजदारी किरकोळ अर्ज १२९/२०२६

अर्जदार:- शोभा बेगाजीराव जाधव वय-६३ वर्षे, धंदा-घरकाम रा.लाठ खु.ता.कंधार जि.नांदेड

विरुध्द

ग्राम विकास अधिकारी,
ग्राम पंचायत कार्यालय लाठ खु.ता.कंधार जि.नांदेड

सदरील जाहिर प्रगटनाद्वारे सर्व संबधितांना कळविण्यात येते की, अर्जदार - शोभा बेगाजीराव जाधव - वय - ६३ वर्षे, धंदा-घरकाम रा.लाठ खु.ता.कंधार जि.नांदेड यांनी त्यांची आई यशोदाबाई बेगाजी जाधव यांच्या मृत्यूची नोंद घेण्याकरीता जन्म-मृत्यु नोंद कायदा १९६९ च्या कलम १३ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जदाराचे आई यशोदाबाई बेगाजी जाधव यांचा मृत्यु दिनांक २१/०९/२०२२ रोजी लाठ खु.ता.कंधार जि.नांदेड येथे मृत्यु झाला असून मृत्युची नोंद गैरअर्जदार यांच्या कार्यालयातील संबंधित अभिलेखामध्ये घेण्यात आलेली नसल्यामुळे गैरअर्जदारास नावाची व मृत्युची दिनांकाची नोंद घेण्यासाठी आदेश पारीत करण्याबद्दल अर्ज दाखल केला आहे.

तरी त्याबाबत कोणाचे व ईतर व्यक्तीचे काही आक्षेप/काही सांगायचे असेल ते हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत सादर करावेत. अन्यथा विचार केला जाणार नाहीत.

पुढील तारीख ०७/११/२०२६ आहे.

आज दिनांक १५/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहायक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय,कंधार

---

## जाहीर समन्स

नांदेड येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात
समक्ष श्री एस.एम.कोलेकर, ७ वे सह. दिवाणी न्यायाधीश
वरिष्ठ स्तर, नांदेड.
विशेष दिवाणी दावा क्र.६६/२०२६
जाहेद अन्वर पी.मोहम्मद अब्दुल रशीद विरुद्ध नागोराव
माधवराव पाचलिंग

प्रती,
प्रतिवादी
नागोराव माधवराव पाचलिंग
वय ५१ वर्षे, धंदा-शेती, रा.मुदखेड, ता.मुदखेड, जि.नांदेड.
मो.९८५०२९७३४५

ज्याअर्थी उपरोक्त वादातील वादी जाहेद अन्वर पी. मोहम्मद अब्दुल रशीद, वय ५१ वर्षे, धंदा-व्यवसाय, रा.इतवारा, ता.व जि.नांदेड यांनी आपल्या विरुद्ध वरीलप्रमाणे दावा दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यात आपणांस प्रतिवादी केलेले आहे. सदर प्रकरणात आपणांस आपली बाजू मांडण्याकरिता या न्यायालयातर्फे बऱ्याच वेळा अर्जात नमूद पत्त्यावर समन्स पाठविण्यात आले होते. परंतु असे दिसून येत आहे की, नमूद पत्त्यावर आपण मिळून येत नाहीत किंवा आपला ठावठिकाणा आढळत नाही, किंवा आपण जाणूनबुजून सदर प्रकरणातील समन्स स्वीकारण्यास टाळाटाळ करीत आहात.

त्याअर्थी उपरोक्त नमूद प्रकरणात आपल्या नावे हे जाहीर समन्स पाठविण्यात येत असून आपणांस याद्वारे सुचित करण्यात येते की, आपण स्वतः अगर वकिलामार्फत दिनांक २६/१०/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता उपरोक्त प्रकरणात हजर होऊन आपली बाजू मांडावी; नसता आपणांस या प्रकरणात काहीही सांगावयाचे नाही असे समजून उपरोक्त प्रकरण आपल्या विरुद्ध एकतर्फी निकाली काढण्यात येईल.

आज दिनांक १६/१०/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | आदेशावरुन |
| कनिष्ठ लिपिक, | स्वाक्षरित/- |
| दिवाणी न्यायालय | सहाय्यक अधिक्षक, |
| दि.न्या.व.स्तर, नांदेड. | दिवाणी न्यायालय,वरिष्ठ स्तर,नांदेड. |

---

हमदस्त-ॲड.के.एस.बेग
जा.क्र.१८३६/२०२६
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग न्यायालय कंधार
दि.१६/१०/२०२६

## जाहीर प्रगटन

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग कंधार जि.नांदेड यांचे न्यायालयात
इतर फौजदारी किरकोळ अर्ज १२२/२०२६

अर्जदार:- श्रीहरी ज्ञानोबा बंदुके वय-४५ वर्षे, धंदा-शेती रा.घागरदरा ता.कंधार जि.नांदेड

विरुध्द

ग्राम विकास अधिकारी,
ग्राम पंचायत कार्यालय घागरदरा ता.कंधार जि.नांदेड

सदरील जाहिर प्रगटनाद्वारे सर्व संबधितांना कळविण्यात येते की, अर्जदार - श्रीहरी ज्ञानोबा बंदुके वय-४५ वर्षे, धंदा-शेती रा.घागरदरा ता.कंधार जि.नांदेड यांनी त्यांची आई कुसूमबाई ज्ञानोबा बंदुके यांच्या मृत्यूची नोंद घेण्याकरीता जन्म-मृत्यु नोंद कायदा १९६९ च्या कलम १३ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जदाराची आई कुसूमबाई ज्ञानोबा बंदुके यांचा मृत्यु दिनांक १४/०६/२०२१ रोजी घागरदरा ता.कंधार जि.नांदेड येथे मृत्यु झाला असून मृत्युची नोंद गैरअर्जदार यांच्या कार्यालयातील संबंधित अभिलेखामध्ये घेण्यात आलेली नसल्यामुळे गैरअर्जदारास नावाची व मृत्युची दिनांकाची नोंद घेण्यासाठी आदेश पारीत करण्याबद्दल अर्ज दाखल केला आहे.

तरी त्याबाबत कोणाचे व ईतर व्यक्तीचे काही आक्षेप/काही सांगायचे असेल ते हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत सादर करावेत. अन्यथा विचार केला जाणार नाहीत.

पुढील तारीख ०४/११/२०२६ आहे.

आज दिनांक १६/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहायक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय,कंधार

---

हमदस्त-एस.जी.सयद (वकिल)
जा.क्र.१७८९/२०२६
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग न्यायालय कंधार
दि.१२/१०/२०२६

## जाहीर प्रगटन

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग कंधार जि.नांदेड यांचे न्यायालयात
इतर फौजदारी किरकोळ अर्ज १०७/२०२६

अर्जदार:- प्रविण पि.संगणाजी फड - वय-२६ वर्षे, धंदा-मजुरी रा.हकनकवाडी ता.उदगीर जि.लातुर हा.मु.मुंडेवाडी ता.कंधार जि.नांदेड

विरुध्द

ग्रामसेवक,
ग्राम पंचायत कार्यालय दिग्रस (बु.) ता.कंधार जि.नांदेड

सदरील जाहिर प्रगटनाद्वारे सर्व संबधितांना कळविण्यात येते की, अर्जदार-प्रविण पि.संगणाजी फड वय-२६ वर्षे, धंदा-मजुरी, रा. हकनकवाडी ता.उदगीर जि.लातुर हा मुंडेवाडी ता.कंधार जि.नांदेड यांनी अर्जदाराचे आजोबा लक्ष्मण मानेजी मुंडे यांच्या मृत्यूची नोंद घेण्याकरीता जन्म-मृत्यु नोंद कायदा १९६९ च्या कलम १३ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जदाराचे आजोबा लक्ष्मण मानेजी मुंडे यांचा मृत्यु दिनांक ०६/०२/२०१९ रोजी मुंडेवाडी ता.कंधार जि.नांदेड येथे मृत्यु झाला असून मृत्युची नोंद गैरअर्जदार यांच्या कार्यालयातील संबंधित अभिलेखामध्ये घेण्यात आलेली नसल्यामुळे गैरअर्जदारास नावाची व मृत्युची दिनांकाची नोंद घेण्यासाठी आदेश पारीत करण्याबद्दल अर्ज दाखल केला आहे.

तरी त्याबाबत कोणाचे व ईतर व्यक्तीचे काही आक्षेप/काही सांगायचे असेल ते हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत सादर करावेत. अन्यथा विचार केला जाणार नाहीत.

पुढील तारीख १६/११/२०२६ आहे.

आज दिनांक ०९/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

| | |
|---|---|
| | आदेशावरुन |
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| क.लि. | सहायक अधिक्षक |
| | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय,कंधार |

---

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# ‘ज्ञानतीर्थ’च्या मंचावर रंगली मराठमोळी लोकधारा

**प्रा.डॉ.विनोद चव्हाण**

नांदेड-घुंगरांचा छुमछुमाट, ढोलकीचा धडधडता ठेका, शब्दांची नजाकत अन् पदन्यासातून उमटणारा लावणीचा अस्सल ठसका अशा बहारदार वातावरणात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि नांदेड एज्युकेशन सोसायटी संचलित सायन्स कॉलेज, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चार दिवसीय आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी महाराष्ट्राच्या समृद्ध लोककलेचा रंग साने गुरुजी विचार मंचावर खुलला. लावणीच्या तालावर थिरकणारी पावले, चेहऱ्यावरचे बोलके भाव, नजरेतून साधलेला संवाद आणि ठसकेबाज अदाकारी यांमुळे उपस्थित रसिकांना मराठमोळ्या कलावैभवाची अविस्मरणीय मेजवानी मिळाली.

लावणी म्हणजे केवळ नृत्य नव्हे, तर शब्द, सूर, ताल, अभिनय आणि भावमुद्रांचा सुरेख संगम. या संगमाची अनुभूती देत विविध महाविद्यालयांतील कलाकारांनी एकाहून एक सरस लावण्या सादर केल्या. प्रत्येक सादरीकरणात वेगळा बाज, निराळा ठसका आणि रसिकांना दाद देण्यास भाग पाडणारी अदाकारी पाहायला मिळाली.बहिर्जी स्मारक महाविद्यालयाच्या



विद्यार्थिनीने नटले तुमच्यासाठी राजसा या लावणीवर नृत्य सादर करत मंचावर शृंगाररसाची नजाकत खुलवली. एमजीएम कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड आयटी, नांदेड येथील करुणा कंधारे आणि सुधांशू सामलेटी यांनी काळ वाटेने जाता जाता तोल माझा सुटला या लावणीच्या ठेक्यावर आपल्या सादरीकरणातून रंगत आणली. त्यांच्या सादरीकरणातील लयबद्धता आणि ठसकेबाजपणाने रसिकांचे लक्ष वेधून घेतले. लातूरच्या राजर्षी शाहू महाविद्यालयाची अंजू कांबळे हिने



जाळीमंदी पिकली करवंदा या लावणीचे सादरीकरण करून लोकगीताच्या गोडव्यात नृत्याची मोहकता मिसळली. दयानंद कला महाविद्यालयाची तनुजा शिंदे हिने पाडाला पिकलाय आंबा या लावणीवर तालबद्ध पदन्यास आणि भावमुद्रांतून रंगत आणली. दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूरच्या अपर्णा पवार हिने मला एकांतात भेटावे या लावणीचे सादरीकरण करत लावणीतील भावाभिनयाचा वेगळा पैलू उलगडला. घालू का हो राया शालू बनारसी या लावणीनेही मंचावर मराठमोळ्या शृंगाराची रंगत वाढवली. ग्रामीण सायन्स महाविद्यालय, विष्णुपुरी येथील प्रज्ञा दुधगावकर हिने नटले तुमच्यासाठी राजसा या लावणीवर ठसकेबाज नृत्य सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. इंदिरा गांधी महाविद्यालय, नांदेड येथील सुप्रिया मोरे हिने या रावजी, बसा भावजी या लावणीतील खट्याळपणा, नजाकत आणि अदाकारीतून मंचावर उत्साह निर्माण केला. रेशमांच्या वेगाने, लाल कळ्यामधल्या धाग्यांनी यांसह अन्य लावण्यांनीही या सांस्कृतिक सोहळ्यात रंग भरले. प्रत्येक लावणीच्या ठेक्यासोबत रसिकांच्या टाळ्यांचा कडकडाट आणि दाद यांची साथ मिळत होती. पारंपरिक लोककलेचा साज, नृत्यातील लयकारी आणि कलाकारांच्या उत्स्फूर्त सादरीकरणामुळे साने गुरुजी विचार मंचावर जणू महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचा जागरच रंगला.

## कोळगाव (खु.) येथील घटनेत जीवे मारण्याचा प्रयत्न करणारे तीन आरोपी मोकाट

भोकर/प्रतिनिधी-तालुक्यातील मौजे कोळगाव (खु.) येथील शेतातील बांधावर गवत टाकन्याचे कारणावरून झालेल्या भांडणात लोखंडी रॉड, धारदार शस्त्र, कुऱ्हाड डोक्यात घालून जीवे मारण्याचा प्रयत्न केला याप्रकरणी तीन आरोपी दोन महिन्यापासून फरार आहेत, पोलिसांची टाळाटाळ होत असून याप्रकरणी मुख्य आरोपींना तात्काळ अटक करावी या मागणीसाठी जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन देण्यात आले, आमरण उपोषणाचा इशाराही देण्यात आला आहे.

भोकर तालुक्यातील कोळगाव खु. येथील शेतकरी राजू नरोटे यांना १६ ऑगस्ट रोजी शेतात गवताचे पुंजाने का टाकले अशी विचारणा केली असता आरोपी दत्तप्रसाद लाडकेकर, केसराबाई किसन लाडकेकर, मुकुंद नागोराव शिंदे, गोपाळ नागोराव शिंदे, दत्ताहरी गोपाळ शिंदे, विशाल गोपाळ शिंदे, मुकुंदा नागोराव शिंदे या सर्वांनी मिळून हातात धारदार शस्त्र, लोखंडी रॉड, कुऱ्हाड घेऊन राजू नरोटे यांच्या डोक्यात घातली व जिवे मारण्याचा प्रयत्न केला राजू नरोटे व अमोल नरोटे यांनाही गंभीर मारहाण केली केशरबाई लाडकेकर हिने अमोल नरोटे यांच्या हातावर विळ्याने वार केले राजू नरोटे यांच्या डोक्यात कुराडीचा घाव घातला. याप्रकरणी फिर्याद दिल्यानुसार भोकर पोलिसात कलम १०९ (१) ३५१ (३) ३५२, १८९ (२) बीएनएस या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या गंभीर प्रकरणातील काही आरोपींना अटक करण्यात आली मात्र मुख्य आरोपी असलेले केसरबाई किसन लाडकेकर, गोपाळ नागोराव शिंदे, विशाल गोपाळ शिंदे यांना दोन महिने होऊन सुद्धा अटक करण्यात आलेली नाही ते मोकाट फिरत आहेत. पोलिसांकडून टाळाटाळ केली जात आहे. याप्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षक नांदेड यांना निवेदन देण्यात आले असून आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी अन्यथा २० ऑक्टोबर पासून आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा अमोल नरोटे यांनी निवेदनात दिला आहे. यशवंत सेनेचे मराठवाडा प्रमुख नागोरावजी शेंडगे, संघटक सुभाष नाईक यांनीही सदर आरोपींना अटक न झाल्यास आंदोलन उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

## घरफोडी व महिलांचे गंठन चोरी करणाऱ्या दोन आरोपींना अटक

नांदेड/प्रतिनिधी-चोरी, घरफोडी व महिलांच्या गळ्यातील सोन्याचे गंठन हिसकावून घेणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी माळटेकडी ब्रिज जवळ अटक केली. त्याच्या जवळून ८ लाख २४ हजार रुपयांचा ऐवज पोलीसांनी जप्त केला आहे.



पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या आदेशावरुन फौजदार महेश कोरे व पोलीस कर्मचारी हे शुक्रवार दि.१६ ऑक्टोबर रोजी नांदेड शहरात गस्त घालीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, चोरी व घरफोडीच्या घटनेतील दोन गुन्हेगार हे माळटेकडी रेल्वे ब्रीज जवळ चोरीचे सोन्याचे व चांदीचे दागिणे विक्री करण्यासाठी थांबलेले आहेत. पोलीसांनी त्वरीत माळटेकडी ब्रीज परिसरात सापळा रचून आरोपींना पकडण्यासाठी छापा टाकला असता ते पळून जावू लागले. पोलीसांनी पाठलाग करुन दोन्ही आरोपी सय्यद जाकीर सय्यद जफर (वय ३०) रा.महेबुबनगर, नांदेड, शेख नयुम शेख इस्माईल (वय २२) रा.मातंगवाडा, हिमायतनगर या दोघांना अटक केली. पोलीसांनी पंचासमक्ष दोघाचीही अंगझडती घेतली असता त्यांच्याजवळ सोन्याचे व चांदीचे दागिणे आढळून आले. पोलीसांनी दोघांचीही कसून चौकशी केली असता त्यांनी चोरी, घरफोडीचे सात गुन्हे केल्याचे सांगितले. तसेच ओमकारेश्वरनगर व माणिकनगर येथुन महिलांच्या गळ्यातील सोन्याचे गंठन हिसकावून घेतल्याची कबुली दिली. पोलीसांनी दोन्ही आरोपीकडून सोन्या-चांदीचे दागिणे, रोख रक्कम व दुचाकी असा ८ लाख २४ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.

### नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१५/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.१४/१०/२०२६

**जाहीर सुचना**

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **पठाण रईसाबी भ्र.पठाण रसूलखान** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **१४६३ गट क्र.-- प्लॉट क्र.--** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **मयत नामे रसूल खान पि.युनुस खान** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- मा.न्यायालयाचे वारसा पत्र, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- युनुस खान ईब्राहीम खान यांचे घर, पश्चिमेस :- शेख मुनिर यांचे घर, उत्तरेस :- शेख शानुर यांचे घर, दक्षिणेस :- रस्ता

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

### नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१५७४/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.१४/१०/२०२६

**जाहीर सुचना**

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **मिर्झा अनिसऊला बेग फैजुला बेग** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **६७६/६८ गट क्र.८१७ प्लॉट क्र.६८** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **अब्दुल मोहसिन अब्दुल मुखीद** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :-८८३५/२०२६ दि.७.९.२०२६, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- २० फूट रुंद रोड आहे, पश्चिमेस :- प्लॉट क्र.६५ आहे, उत्तरेस :- प्लॉट क्र.६९ आहे,दक्षिणेस :- प्लॉट क्र.६७ आहे.

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

### नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१५७७/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.१४/१०/२०२६

**जाहीर सुचना**

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **शांताबाई बालाजी गिरी** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **५७३/४० गट क्र.५७३ प्लॉट क्र.४०** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **हनुमंत चांदू वाघमारे** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :-१०७८/२०२६ दि.१०.७.२०२६, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- प्लॉट क्र.२३ आहे, पश्चिमेस :- २५ फूट रोड, उत्तरेस :- प्लॉट क्र.४१ आहे, दक्षिणेस :- प्लॉट क्र.३९ आहे.

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

### नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१५७९/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.१४/१०/२०२६

**जाहीर सुचना**

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **शेख निसार शेख नसीर** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **१७५५/३८ गट क्र.६०३ प्लॉट क्र.--** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **१) शेख ईस्माईल शेख महेमूद, २) सय्यद मुजीब सय्यद दस्तगीर** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :-१००८/२०२६ दि.१८.६.२०२६, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- सय्यद अकबर अली यांचे घर, पश्चिमेस :- मोहम्मद रशीद यांचे घर, उत्तरेस :- प्लॉट क्र.८८ चा भाग उर्वरीत, दक्षिणेस :- २० फूट रस्ता.

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

### नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१५७८/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.१४/१०/२०२६

**जाहीर सुचना**

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **सय्यद आमेर सय्यद मोईन** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **१९८५/३१-J गट क्र.५६६ प्लॉट क्र.३१** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **रफि पि.महेमुद शेख** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- ६४१/२०२६ दि.१०.०४.२०२६, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील खुबा कॉलनी नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- १५ फूट रस्ता, पश्चिमेस :- प्लॉट क्र.२७, उत्तरेस :- प्लॉट क्र.३२, दक्षिणेस :- प्लॉट क्र.३०

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

### नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१५७५/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.१४/१०/२०२६

**जाहीर सुचना**

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **धोंडीबा महादजी दाळपूसे** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **५७६/१ गट क्र.गावठाण प्लॉट क्र.--** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **मयत नामे महादू धोंडीबा दाळपूसे** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- मा.न्यायालयाचे वारसा पत्र, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- संभाजी दाळपूसे यांचे घर, पश्चिमेस :- रस्ता, उत्तरेस :- रस्ता, दक्षिणेस :- धारोजी चिमनाजी बारसे यांचे घर

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

### नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१५७२/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.१४/१०/२०२६

**जाहीर सुचना**

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **१) बालाजी दुर्गा देशमुख,२) ताईबाई बालाजी देशमुख** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **१५४० पैकी भागावर गट क्र.- प्लॉट क्र.--** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **मलू पि.दुर्गाजी देशमुख** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- १११७/२०११ दि.२०.७.२०११, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- विनोद गंगाधर यांची जागा, पश्चिमेस :- गोविंद मलू यांची जागा, उत्तरेस :- साहेबराव देशमुख व विनायक वंटनकर यांची जागा, दक्षिणेस :- गंगाधर मुकत्या यांची जागा

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

### नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१५७३/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.१४/१०/२०२६

**जाहीर सुचना**

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **सिध्दीखा बेगम ऐजाज खॉन** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **४३४/२ बी गट क्र.-- प्लॉट क्र.--** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **मोहम्मद पाशा अब्दुल नबी** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :-१४०३/२०१० दि.३१.१२.२०१०, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- शेळके यांचे घर, पश्चिमेस :- १० फूट रस्ता, उत्तरेस :- अनवर अली यांचे घर, दक्षिणेस :- मुसा यांचे घर.

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

# पाणीपुरवठा योजनांची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करा-पालकमंत्री अतुल सावे

## संभाव्य पाणी टंचाई संदर्भात आढावा बैठक संपन्न

नांदेड/प्रतिनिधी-जिल्ह्यातील पाणीटंचाईची संभाव्य परिस्थिती लक्षात घेता सर्व अपूर्ण पाणीपुरवठा योजनांची कामे तातडीने पूर्ण करावीत. काही ठिकाणी कामांना अडथळे येत असल्यास पोलीस प्रशासनाची मदत घेऊन कामे वेळेत पूर्ण करावीत. विद्युत जोडणीअभावी रखडलेली कामे तातडीने सुरू करावीत. तसेच पिण्याच्या पाण्याव्यतिरिक्त धरणांतील १० टक्के अतिरिक्त पाणीसाठा सुरक्षित ठेवावा आणि ऑगस्ट २०२७ पर्यंतच्या पाणीपुरवठ्याचे नियोजन करावे, असे निर्देश पालकमंत्री अतुल सावे यांनी दिले.

येथील शासकीय विश्रामगृहात पालकमंत्री श्री. सावे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अपूर्ण पाणीपुरवठा योजना, शहरी व ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचे नियोजन आणि पशुधनासाठी चारा उपलब्धतेचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती.या बैठकीस माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन आणि महानगरपालिका आयुक्त महेशकुमार डोईफोडे यांची प्रमुख उपस्थिती होती.पाणीपुरवठा योजनांच्या रेट्रोफिटिंगच्या कामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासनस्तरावर लवकरच बैठक घेण्यात येईल. पाणीपुरवठ्याशी संबंधित प्रलंबित देयकांसाठी आवश्यक निधीचे प्रस्ताव तातडीने सादर करावेत. या देयकांचा निपटारा करण्यासाठी मुंबई येथे बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावण्यात येतील, असे पालकमंत्री श्री. सावे यांनी सांगितले.



निधीअभावी पिण्याच्या पाण्यासाठी आवश्यक उपाययोजनांमध्ये अडथळे येऊ नयेत, यासाठी महसूल, जलसंपदा विभाग, पोलीस, नगर पालिका, महानगर पालिका आणि जिल्हा परिषद या सर्व विभागांनी समन्वयाने काम करुन दुष्काळी परिस्थितीवर मात करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.जलजीवन मिशनअंतर्गत जिल्हा परिषद आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सुरू असलेल्या तसेच पूर्णत्वाच्या टप्प्यात असलेल्या पाणीपुरवठा योजनांचा आढावा घेऊन उर्वरित कामे निर्धारित वेळेत पूर्ण करावीत. राज्यस्तरावर प्रलंबित असलेल्या सुधारित पाणीपुरवठा योजना, पाणीटंचाई आराखडा, इसापूर धरणातील उद्धव विहिरीचे काम आणि विद्युत जोडणीची प्रलंबित कामे यांना प्राधान्य द्यावे, असे निर्देश त्यांनी दिले.

शहर आणि ग्रामीण भागात पाण्याचा काटकसरीने वापर होण्यासाठी महानगरपालिका व नगरपालिकांनी आवश्यकतेनुसार पाणीपुरवठ्याचे नियोजन आणि पाणीकपात करावी. अनधिकृत नळजोडण्या, पाण्याचा अवैध उपसा आणि पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात. पुनर्वापरित पाणी बांधकामे आणि रस्त्यांच्या कामांसाठी वापरण्यावर भर द्यावा. संभाव्य पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा, बोअरवेल पुनर्भरण, नाला खोलीकरण, विहिरींची कामे आणि जलसंधारणाच्या उपाययोजनांना प्राधान्य द्यावे. तसेच गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार आणि जलतारा योजनेअंतर्गत प्रस्तावित कामे गतीने पूर्ण करावीत, असे निर्देश त्यांनी दिले.जिल्ह्यातील संभाव्य पाणीटंचाईबरोबरच पशुधनासाठी पुरेसा चारा उपलब्ध राहील, यासाठी संबंधित विभागांनी नियोजन करावे, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले आहेत.

# ठाकरेंचा दसरा मेळावा शिवाजी पार्कवरच

## मुंबई मनपाची सशर्थ परवानगी

मुंबई/प्रतिनिधी-यावर्षी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या दसरा मेळाव्याला मुंबई महापालिकेच्या जी-उत्तर विभागाने खा.अनिल देसाई यांच्या अर्जानंतर परवानगी दिली आहे. मात्र, या परवानगीसोबत २४ अटी घालण्यात आल्या आहेत.

शिवसेनेतील फुटीनंतर शिवाजी पार्कवरील दसरा मेळाव्याला राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. १९ ऑक्टोबरला पूर्वतयारी, तर २० ऑक्टोबरला मुख्य मेळावा होणार आहे. मैदान वापरासाठी प्रतिदिन ५०० रुपये, त्यावर १८ टक्के वस्तू व सेवा कर आणि २५० रुपये परवाना शुल्क भरावे लागणार आहे. याशिवाय २० हजार रुपयांची अनामत रक्कम जमा करावी लागेल. रात्री दहानंतर ध्वनिवर्धक वापरण्यास बंदी, मैदानात वाहनांना प्रवेश नाही, खोदकाम व मैदानाचे नुकसान करण्यास मनाई, तसेच कार्यक्रमानंतर मैदान स्वच्छ करून पूर्वस्थितीत देण्याचे बंधन घालण्यात आले आहे. मुंबई पोलीस, वाहतूक पोलीस आणि अग्निशमन दलाच्या आवश्यक परवानग्याही स्वतंत्रपणे घ्याव्या लागतील.कायदा-सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी आयोजकांची असेल. अटींचा भंग झाल्यास अनामत रक्कम जप्त करण्यासह परवानगी रद्द करण्याची कारवाई होऊ शकते. त्यामुळे मेळाव्याची तयारी करताना ठाकरे गटाला महापालिकेच्या नियमांचे काटेकोर पालन करावे लागणार आहे.

# घरकुल कामात निष्काळजीपणा भोवला: १५ अभियंत्यांवर बदलीची कुऱ्हाड

मुखेड/प्रतिनिधी-ग्रामीण भागातील गोरगरीब लाभार्थ्यांच्या घरकुल योजनांची कामे प्रलंबित ठेवणे आणि कामात हलगर्जीपणा करणे मुखेड पंचायत समितीमधील १५ ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांना चांगलेच भोवले आहे. त्यांच्या असमाधानकारक कामकाजावर ठपका ठेवत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड यांनी या सर्व अभियंत्यांच्या बदलीची शिफारस केली आहे. यासंदर्भात राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, मुंबई यांना पत्र पाठवून नवीन अभियंते उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आल्याने संबंधित विभागात प्रचंड खळबळ उडाली आहे.

मुखेड पंचायत समिती अंतर्गत सुरू असलेल्या घरकुल योजनांचा आढावा घेताना या अभियंत्यांच्या कामाबद्दल वारंवार गंभीर तक्रारी समोर येत होत्या. बैठकांमध्ये सक्त सूचना देऊन आणि कारणे दाखवा नोटिसा बजावूनही संबंधित अभियंत्यांनी निर्धारित वेळेत समाधानकारक खुलासे सादर केले नाहीत. अखेर या तक्रारींची गंभीर दखल घेत जिल्हा प्रशासनाने बदलीचा प्रस्ताव तयार केला. तसेच आ.डॉ. तुषार गोविंदराव राठोड आणि पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनीही या अभियंत्यांच्या कारभाराबाबत वरिष्ठांकडे पत्रव्यवहार केला होता. गटविकास अधिकाऱ्यांच्या १६ सप्टेंबरच्या पत्रानंतर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने ही ठोस भूमिका घेत मुंबई कार्यालयाकडे पाठपुरावा केला आहे. या कारवाईच्या कक्षेत आलेल्या १५ अभियंत्यांमध्ये आकाश कलेपवार, आकाश मुत्तेपवार, आशिष ग्यादलवाड, इब्राहिम मचकुरी, उमेश श्रीरामे, पांडुरंग काटशेव, प्रतीक्षा आडे, प्रवीण जोडराणे, बाबुराव दिंडे, मुबिन शेख, वैभव राठोड, संकेत चव्हाण, सचिन नाईक, सचिन पवार आणि सागर पवार यांचा समावेश आहे. ग्रामीण भागात घरकुल योजना वेळेत पूर्ण करणे आणि लाभार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करण्याची मुख्य जबाबदारी या अभियंत्यांवर असते. मात्र, त्यांच्या निष्क्रियतेमुळे कामाचा वेग मंदावला होता. आता वरिष्ठ प्रशासन यावर अंतिम निर्णय कधी घेते आणि नवीन अभियंते आल्यानंतर रखडलेल्या घरकुलांच्या कामांना गती मिळणार का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# उमरीत आज 'होम मिनिस्टर'चा रंगणार पैठणीचा खेळ!

उमरी/प्रतिनिधी-नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून उमरी शहरात आयोजित करण्यात आलेल्या केडी बॉस भव्य दांडिया महोत्सव अंतर्गत शनिवार, दि. १७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता मोंढा मैदान येथे होम मिनिस्टर - खेळ पैठणीचा, सन्मान नारीशक्तीचा या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सौ. जाईताई कैलासराव देशमुख गोरठेकर यांच्या पुढाकारातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. संदीप जाधव सर प्रस्तुत या कार्यक्रमात झी टॉकीजचे मिमिक्री कलाकार विविध मनोरंजक सादरीकरणे करणार आहेत.



महिलांसाठी खेळ पैठणीचा, विविध मनोरंजक स्पर्धा, लकी ड्रॉ आणि आकर्षक बक्षिसे ही कार्यक्रमाची प्रमुख आकर्षणे असणार आहेत. त्यामुळे उमरी शहरातील महिला व भगिनींना मनोरंजनाची अनोखी संधी उपलब्ध होणार आहे. पारंपरिक दांडिया नृत्याबरोबरच महिलांसाठी आयोजित विशेष कार्यक्रमांमुळे महोत्सवात विविधतेची भर पडत आहे.या होम मिनिस्टर कार्यक्रमात उमरी शहर व परिसरातील जास्तीत जास्त माता-भगिनींनी सहभागी होऊन कार्यक्रमाचा आनंद घ्यावा, असे आवाहन कार्यक्रमाच्या आयोजिका सौ. जाईताई कैलासराव देशमुख गोरठेकर यांनी केले आहे.

# सिडको भागातील कुंटनखान्यावर पोलीसांची धाड;दोन जणांना अटक

नांदेड/प्रतिनिधी-सिडको भागातील क्रांती चौक येथे एका भाड्याच्या घरात कुंटनखान्यावर पोलीसांनी धाड टाकुन दोन जणांना अटक करण्यात आली. एका अल्पवयीन मुलीसह दोन महिलांची पोलीसांनी सुटका केली आहे.

क्रांती चौक येथे भाड्याच्या घरात शोभा रासे व तीचा पती शंकर रासे हे स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी कुंटनखाना (वैश्या व्यवसाय) चालवत असल्याची माहिती पोलीस उपअधीक्षक रामेश्वर वैंजने यांना मिळाली. पोलीस अधीक्षक रामेश्वर वैंजने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अशोक जाधव यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अनुपमा केंद्रे व पोलीस कर्मचाऱ्यांचे एक पथक तयार करण्यात आले. पोलीस पथकाने शुक्रवार दि.१६ ऑक्टोबर रोजी दक्षिणमुखी हनुमान मंदिर सिडको येथुन एक बनावट ग्राहक तयार करुन त्याच्या जवळ ठराविक क्रमाकाच्या नोटा देवून शोभा रासे हिच्या घरी पाठविले. बनावट ग्राहकाने घरी जावून शोभा रासे हिच्यासोबत चर्चा केली. दोघांमध्ये व्यवहार ठरल्यानंतर बनावट ग्राहकाने पोलीस पथकाला इशारा केला. त्यानंतर पोलीसांनी लगेच घरावर छापा टाकला. शोभा शंकर रासे (वय ४५) रा.एन.डी.४२ क्रांती चौक,सिडको व शंकर चुडामन रासे (वय ५१) रा.एन.डी.४२ क्रांती चौक,सिडको यांना अटक केली. घरातील बाजुच्या खोलीमध्ये दोन पिडीत महिला व एक अल्पवयीन मुलगी पोलीसांना आढळून आली. पोलीसांनी पिडीत महिलांकडे चौकशी केली असता त्यांनी आपली आर्थिक परिस्थिती बेताची असल्याचा गैरफायदा घेवून रासे दाम्पंत्य हे पैशाचे आमिष दाखवून वैश्या व्यवसायासाठी प्रवृत्त करीत होते. पोलीसांनी घटनास्थळावरुन रोख रक्कम, मोबाईल, साहित्य असा ऐवज जप्त केला आहे. याप्रकरणी शंकर रासे व शोभा रासे या पती-पत्नी विरुद्ध नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३८३/२०२६
(CNR No.MHND10-001287-2026)

अर्जदार -

| | | | |
|---|---|---|---|
| १ | वंदनाबाई भ्र.विठ्ठल पांढरे | वय-५५ वर्षे | धंदा-घरकाम |
| २ | गोविंद पि.विठ्ठल पांढरे | वय-२५ वर्षे | धंदा-मजुरी |
| | दोघे रा.कुरुळा ता.कंधार जि.नांदेड | | |
| ३ | सुनिता भ्र.हरीश माडकर | वय-२७ वर्षे | धंदा-घरकाम |
| | रा.लातुर ता.जि.लातुर | | |
| ४ | संगिता भ्र.कपिलेश्वर खांडेकर | वय-२६ वर्षे | धंदा-घरकाम |
| | ता.वानी ता.तुळजापूर जि.सोलापूर | | |

गैरअर्जदार १- शाखा व्यवस्थापक साहेब,
नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँक,शाखा कुरुळा,
ता.कंधार जि.नांदेड

प्रकरण : अर्जदार यांना भारतीय वारसा कायदा १९२५ मधील कलम ३७२ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबत.

ज्याअर्थी वरील अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२ ते ४ चे वडिल नामे विठ्ठल गोविंदराव पांढरे हे होते. विठ्ठल गोविंदराव पांढरे हे दि.३०/०८/२०२६ रोजी मयत झाले आहेत. गैरअर्जदार बँकेमध्ये मयत विठ्ठल गोविंदराव पांढरे यांचे बचत खाते क्र.१०४४१०००१००१३१० असा आहे. सदरील खात्यामध्ये मयताचे नावे १,५६,४१८/- (एक लाख छप्पन हजार चारशे आठरा रुपये) इतकी रक्कम जमा आहे. अर्जदार यांचे म्हणणे आहे की, अर्जदाराशिवाय इतर कोणीही मयताचे वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना गैरअर्जदार यांच्या खात्यातील जमा रक्कम वारसा आधारे अर्जदार यांना उचलणे संबंधी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत विठ्ठल गोविंदराव पांढरे यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-२१/११/२०२६

आज रोजी दि.१५/१०/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार


# माहूरगडावर सप्तमीला २१ कुमारिकांचे पूजन

माहूर/प्रतिनिधी-श्रीक्षेत्र माहूरगडावरील श्री रेणुका देवीच्या शारदीय नवरात्र महोत्सवात शनिवारी (ता.१७) सप्तमीनिमित्त २१ कुमारिकांचे विधिवत पूजन करण्यात आले. शनिवार असल्याने रेणुकामातेच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. दरम्यान, शुक्रवारी सायंकाळी राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे आणि माजी शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी रेणुकामातेचे दर्शन घेऊन पूजा-अर्चा केली.

सप्तमीच्या पर्वानिमित्त शनिवारी सकाळी आठ वाजता श्री रेणुका देवीच्या पूजा-



अभिषेक विधीला सुरुवात झाली. देवीचा आकर्षक शृंगार करून सुवर्णालंकार चढविण्यात आले. घटाला सातवी माळ अर्पण करण्याचा विधी पुजारी भवानीदास भोपी, शुभम भोपी, अमित भोपी आणि उज्वल भोपी यांच्या हस्ते पार पडला. त्यानंतर रेणुकामातेची महाआरती करण्यात आली. मंदिर परिसरात छबिना काढण्यात आला. सप्तमी आणि शनिवारचा योग साधत भाविकांनी दर्शनासाठी मंदिरात गर्दी केली होती. त्यामुळे संपूर्ण गडावर भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. सप्तमीचे प्रमुख आकर्षण असलेल्या २१ कुमारिकांच्या पूजनाचा सोहळा श्री महालक्ष्मी मंदिरासमोर पार पडला. शक्तिस्वरूप मानल्या जाणाऱ्या कुमारिकांचे विधिवत पूजन करून त्यांना भेटवस्तू देण्यात आल्या. संस्थानचे विश्वस्त चंद्रकांत भोपी, अरविंद देव तसेच पुजारी अमित भोपी आणि उज्वल भोपी यांच्या हस्ते हा धार्मिक विधी करण्यात आला. शुक्रवारी सायंकाळी पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी श्री रेणुका देवीची पूजा करून महाआरती केली. यावेळी आ.श्वेता महाले उपस्थित होत्या. राज्याचे माजी शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनीही रेणुकामातेचे दर्शन घेतले.


**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक - २७/०८/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

## जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार मोहन पुंडलिक नवघरे रा. शिर्षी (खु) ता. कंधार जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांची मुलगी प्रतीक्षा मोहन नवघरे रा.शिर्षी (खु) ता. कंधार जि. नांदेड यांचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव प्रतीक्षा मोहन नवघरे रा.शिर्षी (खु) ता.कंधार या ठिकाणी दि. १७/१२/२०१० या दिवशी जन्म झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक १०/०८/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रकटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार


पान १ वरुन

### किनवटमध्ये रेल्वे रुळांवर...

सहाय्यक आयुक्त व त्यांचे सहाय्यक तसेच पार्डी खुर्द येथील पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी उत्तरीय तपासणी करून प्रयोग शाळेकडे नमूने पाठवल्याचे सूत्रांनी सांगितले. रेल्वेच्या धडकेत वाघीणी सारखा अतीचंचल वन्यजीव मृत होणे यावर कोणाचाही विश्वास बसायला तयार नाही. वाघीण धडकेपुर्वी रेल्वे ट्रॅकवर जीवंत आली असती तर धडकेत तिचे तुकडे होत होते, नाहीतर बाजुला फेकली असती. एक कि.मि.च्या आसपास फरफटत नेल्याने मासाचा सडा पडला तो वनकर्मचाऱ्यांनी जमा केल्याचे वृत्त आहे. वाघीणीचा घातपात करून तिचा मृतदेह रेल्वे ट्रॅकवर फेकला असावा असा या घटनेवरून लोकांदाच व्यक्तविला जात असलातरी प्रशासनाने मात्र दुपारपर्यंत संपर्क केल्यानंतरही प्रतिसाद दिलेला नाही. फोन उचलण्याचे औदार्य दाखवलेले नाही. सर्वांनीच गोपनीयता पाळली होती, हे विशेष.

### सणासुदीत साखरेचे दर ...

वाढण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत पुरवठा वाढवण्याचा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. मात्र, प्रत्यक्ष किरकोळ दरांवर स्थानिक मागणी, वाहतूक खर्च आणि बाजारातील उपलब्धता यांचाही परिणाम होणार आहे.साखरेचा पुरवठा वाढवून संभाव्य दरवाढ रोखण्याचा सरकारचा प्रयत्न असला, तरी सणासुदीच्या काळात ग्राहकांना प्रत्यक्ष किती दिलासा मिळतो, हे बाजारातील दरांवरून स्पष्ट होणार आहे.

### पालाईगुडा फाट्याजवळ...

प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ. विजया जुने यांनी तपासणी केल्यानंतर गजानन आशेवाड यांना मृत घोषित केले. अन्य जखमींपैकी दोघांच्या पायाला व डोक्याला गंभीर दुखापती झाल्याने त्यांना पुढील उपचारासाठी आदिलाबाद आणि यवतमाळ येथे पाठविण्यात आल्याची माहिती आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अॅण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४